# मेट्रो ३ चे ४२ पैकी ४० भुयारांचे काम पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या एकूण ४२ भुयारांपैकी ४० भुयारांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित दोन बोगद्यांसाठी टीबीएम असेंब्लिंगचे काम सुरू करण्यात आल्याचे एमएमआरसीएलने स्पष्ट केले आहे. ज्या मेट्रो भुयाराचे काम राहिले आहे, त्या भुयाराची लांबी १६६० मीटर असून, येत्या अडीच महिन्याचा कालावधी लागणार आहे. अप आणि डाऊन अशा ३३.५ किमी लांबीच्या भूमिगत मेट्रो ३ च्या बांधकामासाठी मोठ्या टनेल बोरिंग मशिन्स वापरण्यात येणार आहेत. या टीबीएम मशीनची लांबी १०० मीटर असून, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज हालचाल करता यावी म्हणून मशीनचे विघटन करण्यात येत आहे. मशीनचे भाग सुटे करण्यासाठी जवळपास ४५ दिवसांचा कालावधी लागतो. एमएमआरसीएलने दिलेल्या माहितीनुसार, सायन्स म्युझियम आणि महालक्ष्मीदरम्यान दोन टीबीएमने बोगद्यांचे काम पूर्ण केले आहे.